
केनियातील वृक्षारोपण चळवळ

वंगारी मथाईची गोष्ट

लेखिका: क्लेअर ए. निव्होला
मराठी भाषांतर: सुशील मेन्सन



जेव्हा आपण एखाद्या समस्येचा भाग असतो तेव्हा आपण त्यावरील उपायाचा भागही बनू शकतो. त्यासाठी आपण स्वत: काय कृती करू शकतो, हा विचार करणे महत्त्वाचे आहे.

2004 या वर्षीचा नोबेल शांती पुरस्कार विजेती आणि *हरित पट्टा चळवळ (ग्रीन बेल्ट मुव्हमेंट)* ची संस्थापक *वंगारी मथाई* केनियाच्या डोंगरकपाऱ्यांत जन्मली व वाढली. तेथील डोंगर हिरव्या वृक्षराजींनी नटलेले असत, झऱ्यांमध्ये असंख्य मासे मुक्तपणे विहरत असत आणि लोक आपल्या शेतांत पिकलेल्या अन्नधान्यांनी आपली पोटे भरत असत. पण वर्षानुवर्षे केलेल्या झाडांच्या कत्तलीमुळे केनियाचे हे देखणे स्वरुप पूर्णपणे पालटून गेले.

वंगारी अमेरिकेतील कॉलेजचे शिक्षण संपवून केनियातील घरी परतली तेव्हा तिला तिथे दिसले सुकलेले झरे, कुपोषीत लोक आणि नष्ट झालेली जंगले! "आपल्याला एकटीला जंगलं पुन्हा उभारता येतील? लोकांना पुन्हा पहिल्यासारखं निरोगी आयुष्य देता येईल?" तिला प्रश्न पडला.


*क्लेअर निव्होला*ने आकर्षक चित्रांद्वारे आणि साध्यासोप्या शब्दांत पर्यावरणवादी *वंगारी मथाई*ची ही प्रेरणादायी गोष्ट सांगितली आहे.

केनियातील वृक्षारोपण चळवळ

वंगारी मथाईची गोष्ट




लेखिका: क्लेअर निव्होला



वंगारी मथाई बालपणची स्मृती जागवत सांगते, त्यावेळी मध्य केनियाच्या डोंगरकपाऱ्यांतील जमीन हिरव्यागार चादरीत लपेटल्यागत दिसे.

अंजीर, ऑलिव्ह, क्रॉटन, पळस अशा वृक्षांनी जमीन आच्छादलेली असे आणि झऱ्यांतील शुद्ध, नितळ पाण्यामध्ये माशांच्या झुंडी दिसत.



अंजीर वृक्ष त्याकाळी पवित्र मानला जाई. त्याच्या खाली पडलेल्या फांद्यासुद्धा जळणासाठी घरी घेऊन जायचे नाही, हे वंगारी जाणत होती. तिच्या घराजवळच्या झऱ्यातून ती आईसाठी पाणी नेत असे. झऱ्याच्या पाण्यातील बेडकांच्या अंड्यांशी ती खेळत असे. या अंड्यांना ती नेकलेसमधील मोत्यांसारखे गोळा करत असे. पण अंडी तिच्या हातातून वारंवार निसटून पुन्हा नितळ पाण्यात पडत.

वंगारीने केनियापासून अतिदूर अमेरिकेत बेनेडिक्ट पंथाच्या नन्स चालवत असलेल्या कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. तिथेही मातृभूमी केनियाचे निसर्गसौंदर्य तिला वारंवार आठवत असे. अमेरिकेत वंगारीने जीवशास्त्राचा अभ्यास केला. तो काळ तिच्यासाठी मोठा स्फूर्तीदायक होता. तेथील शिक्षणात जग अधिकाधिक समृद्ध कसे बनवता येईल, यावरही विचार होत असे. नन्सनी वंगारीला फक्त स्वत:बद्दलच नव्हे तर आजूबाजूच्या जगाबद्दलही विचार करण्यास शिकवले.

मोठ्या उत्साहाने आणि अपेक्षेने ती केनियाला परतली. ती नवनव्या गोष्टी शिकून आली होती आणि त्याचा उपयोग तिला आपल्या लोकांसाठी करायचा होता.







ती केनियापासून फक्त पाच वर्षे दूर राहिली. पण परतल्यावर केनियात झालेला बदल पाहून तिला आपण वीस वर्षे दूर होतो की काय, असे वाटले.

तेथील अंजीर वृक्ष तोडलेले होते, लहान झरे सुकून गेले होते, झऱ्यातील बेडकांचा, त्यांच्या पिल्लांचा व अंड्यांचा मागमूस दिसत नव्हता. पाच वर्षांपूर्वी लोक आपल्या कुटुंबाला खायला घालण्यासाठी छोट्याशा शेतात धान्य उगवत आणि निर्यात करण्यासाठी मोठ्या शेतात चहा उगवत. पण आता जवळजवळ सगळेच लोक बाजारात विकली जाणारी पिके शेतात उगवत होती. लोक आपले अन्न स्वत: पिकवत नव्हते तर दुकानांतून खरेदी करत होते. दुकानात मिळणारे अन्नधान्य महाग होते. ते शरीरासाठीही फारसे पोषक नव्हते. यामुळे लहान-मोठे सारेच अशक्त आणि आजारी दिसू लागले.

ज्या डोंगरांवर हिरवेगार वृक्ष आणि चरणाऱ्या गुरांची दाटी दिसे, ते डोंगर झाडे तोडल्यामुळे पुरते बोडके झाले होते. व्यापारी पिकांची शेती करण्यासाठी ही झाडे तोडून जागा मोकळी करण्यात आली होती. यामुळे स्त्रियांना आणि मुलांना जळणासाठी लाकडे शोधायला खूप दूरपर्यंत पायपीट करावी लागत होती. एखादे झाड सापडण्यासाठी कधीकधी त्यांना तासनतास चालावे लागत होते. हळूहळू एकएक करून सगळी झाडे तोडली गेली आणि बरीचशी जमीन वाळवंटागत उजाड दिसू लागली.





झाडे नसल्यामुळे माती धरून ठेवणारी मुळे नव्हती, तसेच सावलीही नव्हती. त्यामुळे जमिनीच्या वरच्या थरातील माती सुकून धूळ बनली. वेगवान वाऱ्यांनी ही धूळ इतरत्र वाहून नेली. अशी सुटी माती पावसाच्या पाण्यासोबत वाहून नदी आणि झऱ्यांमध्ये जाऊ लागली. परिणामी, नितळ नदी-झऱ्यांतील पाणी गाळ साचून धुळकट दिसू लागले.


“आम्हाला प्यायला स्वच्छ पाणी नाही,” गावातील बायका तक्रार करू लागल्या, “अन्न शिजवायला जळाऊ लाकडं नाहीत. गुरांना चरायला गवत, झाडं-झुडपं नाहीत. त्यामुळे ती दूध कमी देतात आणि आमची मुलं भुकेली राहातात. आता आम्ही पहिल्यापेक्षा जास्त गरीब झालोय.”


वंगारीने पाहिलं की जे लोक पूर्वी अंजीर वृक्षांचा आदर करत, तेच आज त्यांना कापत आहेत. ज्या जमिनीने खायला घातले त्याच जमिनीची काळजी लोक घेत नव्हते. आता ही नापीक आणि पीडित जमीन लोकांची काळजी घेऊ शकत नव्हती. यामुळे जगणे अधिकाधिक कठीण होत चालले होते.

स्त्रियांनी या परिस्थितीचा दोष इतरांवर आणि सरकारवर टाकला. पण वंगारी तक्रार करत बसणारी स्त्री नव्हती. ती स्वतः काही करू इच्छित होती. “परिस्थिती बदलण्यासाठी आपण स्वतः काय करू शकतो, यावर विचार करा,” ती निग्रहाने म्हणाली, “केनियातली झाडं आपण स्वतःच तोडतोय, हे लक्षात घ्या.”

“आपण या समस्येचा भाग आहोत,” ती म्हणाली, “तर मग आपण त्यावरील उपायाचा भागही बनू शकतो.”


तिच्या डोक्यात एक साधीसरळ आणि भव्य कल्पना घोळत होती.






“आपण झाडं लावूयात का?” तिने स्त्रियांना सुचवले.

तिने स्त्रियांना उरल्यासुरल्या झाडांच्या बिया गोळा करायला शिकवले. तिने त्यांना माती आणि खत तयार करायला शिकवले. तिने त्यांना माती ओली करायला, त्यावर काठी दाबून छिद्र पाडायला आणि त्यात काळजीपूर्वक बी रुजवायला शिकवले. तिने त्यांना वाढत्या अंकुराची तान्ह्या बाळासारखी काळजी घ्यायला शिकवले. अंकुराला दिवसातून दोन वेळा पाणी दिल्यावर त्यांची वाढ जोमाने होईल, हे तिने त्यांना सांगितले.



हे काम सोपे नव्हते. पाणी मिळवणे खूप कठीण होते. स्त्रिया नेहमी हाताने खोल खड्डा खणत आणि त्यात उतरत. खड्ड्यातील पाणी त्या बादल्यांमध्ये भरून बादल्या डोक्याच्या वरपर्यंत उचलून खड्ड्याबाहेर उभ्या असलेल्या बाईकडे देत.

वंगारीने आपल्या परसदारी एक बगीचा तयार केला होता. पण तेथील लहान लहान रोपटी कोमेजून गेली. वंगारीने प्रयत्न सोडले नाहीत. तिने इतरांनाही सतत प्रयत्न करत राहायला शिकवले.



गावातील बहुतांशी स्त्रियांना लिहिता-वाचता येत नव्हते. त्या घरकाम आणि शेती करत. त्यांच्या मतांना कुणी गंभीरपणे घेत नसे.

पण झाडे लावायला त्यांना शाळेत जायची गरज नव्हती की सरकारच्या मदतीची वाट पाहाण्याची गरज नव्हती. त्या आपल्या आयुष्यात स्वतःच बदल आणू शकत होत्या.

झाडे लावण्याच्या कामात खूप कष्ट होते, तरी स्त्रियांना ते करण्यात अभिमान वाटू लागला. हळूहळू, त्यांना आपल्या श्रमाचे फळ दिसू लागले. जंगल पुन्हा वाढू लागले. आता लोक एक झाड कापले तर त्याजागी दोन झाडे लावू लागले. त्यांनी लागवड केलेल्या झाडांपासून मिळणारी फळे तसेच विविध कंद, कसावा, वाटाणा, ज्वारी खाऊन त्यांच्या कुटुंबीयांचे आरोग्य सुधारले. आता त्यांच्याकडे काही काम होते आणि या कामामुळे नव्याने एकत्र वाढलेल्या जंगलातील झाडांसारखेच लोकसुद्धा एकत्र आले.


पुरुषांनी आपली पत्नी, माता आणि मुलींनी केलेले काम पाहिले तेव्हा त्यांनी त्यांचे कौतुक केले आणि तेदेखील या कामात सामील झाले.






वंगारीने शाळेतील मुलांनाही रोपे वाटली आणि त्यांना स्वत:चा बगीचा तयार करायला शिकवले.

वंगारीने सैनिकांना तसेच तुरुंगातील कैद्यांनाही रोपे वाटली. ती सैनिकांना उद्देशून म्हणाली, “तुम्ही बंदूक चालवता. पण तुम्ही कुणाचे रक्षण करताय? हा देश, त्याची माती तर वारा आणि पाण्यासोबत नाहीसे होत चाललेयत. तुम्ही तुमची बंदूक उजव्या हातात जरूर धरून ठेवा. पण डाव्या हातात मात्र एक रोपटे धरा. तेव्हाच तुम्ही एक चांगले सैनिक बनाल.”





वंगारीने आपली चळवळ सुरू केल्यापासून तीस वर्षात केनियातील लोकांनी तीन कोटीपेक्षा जास्त झाडांची लागवड केली आणि हे काम अद्यापही सुरू आहे.

वंगारी लोकांना सांगते, “उघडी-बोडकी जमीन आपल्याकडे मदतीचा आक्रोश करत असते. तिच्या अंगावर आपण झाडांचा पोषाख चढवायला हवा. हाच जमिनीचा स्वभाव आहे. तिला हिरव्या रंगाची, हिरव्या पोषाखाची गरज आहे.”



2004 साली वंगारी मथाई शांततेचा नोबेल पुरस्कार प्राप्त करणारी पहिली आफ्रिकन स्त्री ठरली. हा पुरस्कार तिला केनियाचे नैसर्गिक पर्यावरण, लोकांचे राहाणीमान व आरोग्य यांबाबत केलेल्या विधायक कार्यासाठी मिळाला. केनियातील बहुतांशी लोक उदरनिर्वाहासाठी जमिनीवर अवलंबून असत. त्यामुळे वंगारी मथाईचे कार्य निश्चितच महान होते.

वंगारी मथाईचा जन्म 1904 साली झाला. त्यावेळी केनिया देश ब्रिटिशांची एक वसाहत होता. वंगारी एका गरीब शेतकऱ्याची मुलगी होती. सेंट्रल हायलँड प्रांतातील सुपीक डोंगराच्या पट्ट्यात ती वाढली. एकोणीसाव्या शतकाच्या अखेरीस ब्रिटिशांनी तिथे रेल्वे आणली आणि युरोपीय लोक तिथे स्थायिक होऊ लागले. त्यांनी तेथील उत्तम प्रतिच्या सुपीक जमिनींवर कब्जा केला. त्यावर मोठ्या प्रमाणात व्यापारी शेती सुरू केली व त्यात केनियाच्या लोकांना मजूर म्हणून ठेवले. उरलेल्या छोट्या जमिनींवर स्थानिक लोक शेती करू लागले. त्यात जे काही पीक उगवेल त्यावर ते आपला उदरनिर्वाह करू लागले. अमेरिकेला जाण्याआधी वंगारीने असा केनिया पाहिलेला होता. अमेरिकेत एट्चिसन प्रांताच्या कॅन्सस शहरातील सेंट स्कोलॅस्टिका (आता बेनेडिक्टाईन) कॉलेजमध्ये तिने जीवशास्त्राचा अभ्यास केला.

1963 साली जेव्हा वंगारी कॅन्ससमध्ये शिकत होती तेव्हाच केनियाला ब्रिटनपासून स्वातंत्र्य मिळाले. 1966 साली परतल्यावर वंगारीला केनिया खूप बदलला असल्याचे दिसले. केनियाची लोकसंख्या वेगाने वाढत होती. जमीन सगळ्या लोकांना अन्न देण्यास सक्षम नव्हती. पारंपारिक पिके घेण्याऐवजी लोक व्यापारी पिके घेऊ लागले होते. व्यापारी शेतीसाठी जंगले कापून अधिकाधिक जमीन मोकळी केली जात होती. केनियात पूर्वीपेक्षा जास्त गरीबी, कुपोषण आणि बेकारी दिसत होती.

केनियातील संकट संपूर्ण पृथ्वीवरील संकटासारखेच होते. सतत वाढती लोकसंख्या काही मर्यादीत नैसर्गिक स्त्रोतांवर अवलंबून होती. या अनुभवातूनच वंगारी मथाईच्या *"हरित पट्टा चळवळ" (ग्रीन बेल्ट मुव्हमेंट)* चा जन्म झाला.

1977 साली स्थापन झालेल्या या चळवळीने केनियातील लोकांना जगण्यासाठी एक हेतू आणि आत्मविश्वास दिला. यातील शैक्षणिक उपक्रमांद्वारे वंगारीने लोकांना अनेक कौशल्ये शिकवली आणि त्यांना सक्रिय नागरिक बनवले. त्यापूर्वी लोक प्रत्येक गोष्टीसाठी सरकारला दोष देत. वंगारी म्हणते, "फक्त झाडं लावणं हेच आमचं काम नाही. या कामातून लोकांना आपल्या पर्यावरणाची जबाबदारी उचलण्याची आणि आपलं भविष्य व आयुष्य बदलण्याची प्रेरणासुद्धा मिळते."



आता संपूर्ण केनियात हरित पट्टा चळवळीचे एका लाखापेक्षा जास्त सदस्य आहेत. त्यांनी हजारो बगीच्यांची लागवड केली आहे. तसेच त्यांनी अनेक स्थानिक प्रकल्पही सुरू केले आहेत. उदाहरणार्थ, एका गावात झाड लावण्याच्या बदल्यात शेतकऱ्याला मधमाश्यांचे पोळे देतात. त्याने पुरेशी झाडे लावली की तो पोळ्याचा मालक बनतो. या पोळ्यातील मध विकून शेतकरी चांगली कमाई करू शकतो. काही शेतकऱ्यांना झाड लावण्याच्या बदल्यात बकरी देतात. या बकरीने मादी पिल्लाला जन्म दिला आणि शेतकऱ्याने ते पिल्लू चळवळीच्या सदस्याकडे आणून दिले तर शेतकरी बकरीचा मालक बनतो. या प्रकारे शेतकऱ्याकडे पशुधन जमा होऊ लागते. पैशाच्या देवाणघेवाणीशिवाय या पद्धतीने गरीब लोक आपले आयुष्य घडवण्याच्या दिशेत एक पाऊल उचलू शकतात.

पुढील काळात आपले काम करताना वंगारी मथाईच्या निश्चयाची आणि धैर्याची कसोटी लागली. 1989 साली तिने राजधानी नैरोबीजवळ उहुरू पार्कमध्ये 62 मजली इमारत उभारण्याच्या सरकारी योजनेला विरोध केला. मग सरकारने गेल्या दहा वर्षांपासून कार्यरत असलेले वंगारीच्या चळवळीचे मुख्यालय बंद केले. सरकार वंगारीवर सूड उगवेल, असे वंगारीच्या मित्रमंडळींना वाटे. त्यांनी वंगारीला वेगवेगळ्या घरांमध्ये आसरा देऊन लपवले. अखेरीस, वंगारीच्या विरोधामुळे सरकारला आपला गगनचुंबी इमारत बांधण्याचा विचार सोडून द्यावा लागला.

1999 साली वंगारी व तिच्या समर्थकांनी करुरा जंगलातील जमिनीचा तुकडा विकण्याच्या सरकारच्या योजनेला विरोध केला. सुरक्षा कर्मचाऱ्यांनी आंदोलनकर्त्यांवर हल्ला केला. यात जखमी झाल्यामुळे वंगारीला हॉस्पीटलमध्ये दाखल करावे लागले. पण या आंदोलनामुळे सरकारला ही योजना बंद करावी लागली.

वंगारीला आपण शूर आहोत, असे कधीच वाटले नाही. तिच्या मते, एखाद्या गोष्टीबद्दल खूप कळवळा असेल व त्यासाठी काही करायला हवे असे वाटत असेल तर ते केले पाहिजे.

2002 साली वंगारी मथाई केनियाच्या संसदेची सदस्य झाली. 2003 साली वंगारी पर्यावरण व नैसर्गिक साधनसंपत्ती मंत्रालयात पर्यावरण मंत्री झाली. वंगारी वावेरू, वंजीरा आणि मुथा या तीन मोठ्या मुलांची आईसुद्धा होती. 25 सप्टेंबर 2011 साली वंगारी मथाईचे निधन झाले.

समाप्त

"लाखो हात मिळून काय करू शकतात, हे विसरू नका!"

- वंगारी मथाई

